

## ह.भ.प. दासगणूकृत

# श्री साईनाथ-स्तवनमंजरी

श्री गणेशाय नम: । हे सर्वाधारा मयूरेश्वरा । सर्वसाक्षी गौरीकुमारा ॥ हे अचिंत्या लंबोदरा । पाहि मां श्री गणपते ॥ १॥ तूं सकल गणांचा आदि ईश । म्हणूनि म्हणती गणेश ॥ तूं संमत सर्व शास्त्रांस । मंगलरुपा भालचंद्रा ॥ २॥ हे शारदे वाग्विलासिनी । तूं शब्द सृष्टिची स्वामिनी। तुझे अस्तित्व म्हणूनी । व्यवहार चालती जगताचे ॥ ३॥ तूं ग्रंथकाराची देवता । तूं भूषण देशांचें सर्वथा ॥ तुझी अवघ्यांत अगाध सत्ता । नमो तुजसी जगदंबे ॥ ४॥ हे पूर्णब्रह्मा संतप्रिया । हे सगुणरुपा पंढरीराया ॥ कृपार्णवा परम सदया । पांडूरंगा नरहरे ॥ ५॥ तूं अवघ्यांचा सुत्रधार । तुझी व्याप्ती जगभर ॥ अवघीं शास्त्रें विचार । करिती तुझ्या स्वरुपाचा ॥ ६॥ पुस्तकज्ञानी जे जे कोणी । त्यां तूं न गवससी चक्रपाणी ॥ त्या अवघ्या मूर्खांनीं । शब्दवाद करावा ॥ ७॥ तुला जाणती एक संत । बाकीचे होती कुंठीत ॥ तुला माझा दंडवत । आदरें हा अष्टांगी ॥ ८॥ हे पंचवक्त्रा शंकरा । हे नररुंडमालाधारा ॥ हे नीलकंठा दिगंबरा । ॐ कार रुपा पशुपते ॥ ९॥ तुझें नाम ज्याचे ओठीं । त्याचें दैन्य जाय उठाउठीं ॥ ऐसा आहे धूर्जटी । महिमा तुझ्या नांवाचा ॥ १०॥ तुझ्या चरणां वंदून । मी हे स्तोत्र करितों लेखन ॥ यास करावें साह्य पूर्ण । तूं सर्वदा नीलकंठा ॥ ११॥ आतां वंदूं अत्रिसुता । इंदिराकुलदैवता ॥ श्री तुकारामादि सकल संतां । तेवीं अवघ्या भाविकांसी ॥ १२॥ जय जयाजी साईनाथा । पतितपावना कृपावंता ॥ तुझ्या पदीं ठेवितों माथा । आतां अभय असू दे ॥ १३॥ तूं पूर्णब्रह्मा सौख्यधामा । तूंचि विष्णू नरोत्तमा ॥ अर्धांगी ती ज्याची उमा । तो कामारी तूंच की ॥ १४॥ तूं नरदेहधारी परमेश्वर । तूं ज्ञाननभींचा दिनकर ॥ तूं दयेचा सागर । भवरोगा औषधी तूं ॥ १५॥ तूं हीनदीना चिंतामणी । तूं तंव भक्तां स्वर्धुनी ॥ तूं बुडतियांना भव्य तरणी । तूं भीतासी आश्रय ॥ १६॥ जगाचे आद्य कारण । जें कां विमलचैतन्य ॥ तें तुम्हीच आहा दयाघन । विश्व हा विलास तुमचाचि ॥ १७॥ आपण जन्मरहित । मृत्यूही ना आपणांप्रत ॥ तेंच अखेर कळून येत । पूर्ण विचारें शोधितां ॥ १८॥ जन्म आणि मरण । हीं दोन्हीं अज्ञानजन्य ॥ दोहोंपासून अलिप्त आपण । मुळींच महाराजा ॥ १९॥ पाणी झ-यांत प्रगटलें । म्हणून कां तेथ उपळलें ॥ ते पूर्वीच होतें पूर्ण भरलें । आले मात्र आंतुनी ॥ २०॥ खाचेंत आले जीवन । म्हणूनि लाधलें

अभिधान ॥ झरा ऐसें तिजलागून । जलाभावी खांचचि ॥ २१॥ लागला आणि आटला । हें मुळीं ठावें न जला ॥ कां कीं जल खाचेंला । देत नव्हतें महत्व मुळीं ॥ २२॥ खांचेसी मात्र अभिमान । जीवनाचा परिपूर्ण ॥ म्हणून तें आटता दारुण । दैन्यावस्था ये तिसी ॥ २३॥ नरदेह ही खांच खरी । शुद्ध चैतन्य विमल वारी ॥ खांचा अनंत होती जरी । तरी न पालट तोयाचा ॥ २४॥ म्हणून अजन्मा आपणां । मी म्हणतसे दयाघना ॥ अज्ञाननगाच्या कंदना । करण्या व्हावें वज्र तुम्ही ॥ २५॥ ऐशा खांचा आजवर । बहुत झाल्या भूमीवर ॥ हल्ली अजून होणार । पुढेही कालावस्थेनें ॥ २६॥ त्या प्रत्येक खांचेप्रत । निराळें नांवरुप मिळत ॥ जेणेंकरुन जगतात । ओळख त्यांची पटतसे ॥ २७॥ आतां चैतन्याप्रत । मी-तूं म्हणणें ना उचित ॥ कां कीं जेथें न संभवतें द्वैत । तेंचि चैतन्य निश्चयें ॥ २८॥ आणि व्याप्ती चैतन्याची । अवघ्या जगाठायीं साची ॥ मग मी-तूं या भावनेची । संगत कैशी लागते ॥ २९॥ जल मेघगर्भींचे । एकपणें एक साचें ॥ अवतरणें भूवरी होतां त्याचे । भेद होती अनेक ॥ ३०॥ जें गोदेच्या पात्रांत । तें गोदा म्हणून वाहिले जात ॥ जें पडे कूपांत । तैसी न त्याची योग्यता ॥ ३१॥ संतरूप गोदावरी । तेथील तुम्ही आहां वारी ॥ आम्ही थिल्लर कूप सरोवरी । म्हणूनि भेद तुम्हां आम्हां ॥ ३२॥ आम्हां व्हावया कृतार्थ । आलें पाहिजे तुम्हांप्रत ॥ शरण सर्वदा जोडून हात । का कीं पवित्रता तुम्हांठाई ॥ ३३॥ पात्रामुळें पवित्रता । आली गोदा-जलासी सर्वथा ॥ नुसत्या जलांत पाहतां । ते एकपणे एकचि ॥ ३४॥ पात्र गोदावरीचें । जें कां ठरलें पवित्र साचें ॥ तें ठरण्यात भूमीचे । गुणदोष झाले साह्य पहा ॥ ३५॥ मेघगर्भींच्या उदकाला । जो भूमिभाग न बदलवी भला ॥ त्याच भूमीच्या भागाला । गोदा म्हणाले शास्त्रवेत्ते ॥ ३६॥ इतरत्र जें जल पडलें । त्यानें पदगुणा स्वीकारलें ॥ रोगी कडू खारट झालें॥ मुळचे गोड असूनी ॥ ३७॥ तैसें गुरुवरा आहे येथ । षड्रिपूंची न घाण जेथ ॥ त्या पवित्र पिंडप्रत । संत अभिधान शोभतसे ॥ ३८॥ म्हणून संत ती गोदावरी । मी म्हणतों साजिरी ॥ अवघ्या जीवांत आहे खरी । आपुली श्रेष्ठ योग्यता ॥ ३९॥ जगदारंभापासून । गोदा आहेच निर्माण ॥ तोयही भरलें परिपूर्ण । तुटी न झाली आजवरी ॥ ४०॥ पहा जेव्हां रावणारी । येता झाला गोदातीरीं ॥ त्या वेळचें तेथील वारी । टिके कोठून आजवरी ॥ ४१॥ पात्र मात्र तेंच उरलें । जल सागरा मिळालें ॥ पावित्र्य कायम राहिलें । जल-पात्रांचें आजवरी ॥ ४२॥ प्रत्येक संवत्सरी । जुनें जाऊनि नवें वारी ॥ येत पात्राभीतरीं । तोच न्याय तुम्हा ठाया ॥ ४३॥ शतक तेंच संवत्सर । त्या शतकांतील साधुवर ॥ हेंच जल साचार । नाना विभूती ह्या लाटा ॥ ४४॥ या संतरुप गोदेसी । प्रथम संवत्सरासी ॥ पूर आला निश्चयेंसीं । सनत्सनक-सनंदनाचा ॥ ४५॥ मागून नारद तुंबर । ध्रुव प्रल्हाद बलि नृपवर ॥ शबरी अंगद वायुकुंमर । विदूर गोपगोपिका ॥ ४६॥ ऐसे बहुत आजवरी । प्रत्येक शतकामाझारीं ॥ पूर आले

वरच्यावरी । ते वर्णण्या अशक्य मी ॥ ४७॥ या सांप्रतच्या शतकांत । संतरुप गोदेप्रत ॥ आपण पूर आलांत । साईनाथा निश्चयें ॥ ४८॥ म्हणून तुमच्या दिव्य चरणां । मी करितो वंदना ॥ महाराज माझ्या दुर्गुणा । पाहूं नका किमपीही ॥ ४९॥ मी हीन दीन अज्ञानी । पातक्यांचा शिखामणी ॥ युक्त अवघ्या कुलक्षणांनी । परी अव्हेर करुं नका ॥ ५०॥ लोहांगीचे दोष । मना न आणी परीस ॥ गांवीच्या लेंड्या ओहोळास । गोदा न लावी परतवूनी ॥ ५१॥ माझ्या मधील अवघी घाण । आपुल्या कृपाकटाक्षेंकरुन ॥ करा करा वेगें हरण । हीच विनंती दासाची ॥ ५२॥ परिसाचा संग होऊन । लोहाचें तें लोहपण । जरी न होय गुरुवरा हरण । तरी हीनत्व परिसासी ॥ ५३॥ मला पापी ठेवूं नका । आपण हीनत्व घेऊं नका ॥ आपण परीस मी लोह देखा ॥ माझी चाड आपणातें ॥ ५४॥ बालक अपराध सदैव करितें । परी न माता रागावते ॥ हे आणून ध्यानातें । कृपाप्रसाद करावा ॥ ५५॥ हे साईनाथ सद्गुरू । तूंच माझा कल्पतरु ॥ भवाब्धीचें भव्य तारूं । तूच अससी निश्चयें ॥ ५६॥ तू कामधेनू चिंतामणी । तूं ज्ञान-नभीचा वासरमणी ॥ तू सद्गुणांची भव्य खाणी ॥ अथवा सोपान स्वर्गीचा ॥ ५७॥ हे पुण्यवंता परम पावना । हे शांतिमूर्ति आनंदघना ॥ हे चित्स्वरुपा परिपूर्णा । हे भेदरहिता ज्ञानसिंधो ॥ ५८॥ हे विज्ञानमूर्ति नरोत्तमा । हे क्षमाशांतीच्या निवासधामा । हे भक्तजनांच्या विश्रामा । प्रसीद प्रसीद मजप्रती ॥ ५९॥ तूंच सद्गुरु मच्छिंदर । तूच महात्मा जालंदर ॥ तूं निवृत्तीनाथ ज्ञानेश्वर । कबीर शेख नाथ तूं ॥ ६०॥ तूंच बोधला सांवता । तूच रामदास तत्वतां ॥ तूच तुकाराम साईनाथा । तूच सखा माणिक प्रभु ॥ ६१॥ या आपुल्या अवताराची । परी आहे अगम्य साची ॥ ओळख आपुल्या जातीची । होऊं न देतां कवणातें ॥ ६२ ॥ कोणी आपणां म्हणती यवन । कोणी म्हणती ब्राह्मण ॥ ऐसी कृष्णासमान । लीला आपण मांडिली ॥ ६३॥ श्रीकृष्णास पाहून । नाना प्रकारें वदले जन । कोणी म्हणाले यदुभूषण । कोणी म्हणाले गुराखी ॥ ६४॥ यशोदा म्हणे सुकुमार बाळ । कंस म्हणे महाकाळ ॥ उद्धव म्हणे प्रेमळ । अर्जून म्हणे ज्ञान जेठी ॥ ६५॥ तैसें गुरुवरा आपणांसी । जें ज्याच्या मानसी ॥ योग्य वाटेल निश्चयेंसी । तें तें तुम्हा म्हणतसे ॥ ६६॥ मशीद आपुले वसतिस्थान । विंधावांचून असती कान ॥ फात्याच्या त-हा पाहून। यवन म्हणणे भाग तुम्हां ॥ ६७॥ तैसी अग्नीची उपासना । पाहुनि आपुली दयाघना ॥ निश्चय होत आमुच्या मना । कीं आपण हिंदू म्हणूनी ॥ ६८॥ परी भेद हे व्यावहारिक । यातें चाहतील तार्किक ॥ परी जिज्ञासू भाविक । त्यां न वाटे महत्व यांचे ॥ ६९॥ आपुली आहे ब्राह्मस्थिती । जात गोत ना आपणांप्रती ॥ आपण अवघ्यांचे गुरुमूर्ती । आम्हां आद्यकारण ॥ ७०॥ यवन-हिंदूचें विपट आलें । म्हणून तदक्य करण्या भलें ॥ मशीद-अग्नीला स्वीकारलें । लीला भक्तांस दावावया ॥ ७१॥ आपण जातगोतातीत ॥ सद्वस्तु जी कां सत् ॥ तीच तुम्ही साक्षात् । तर्कातीत

साच कीं ॥ ७२॥ तर्कवितर्कांचे घोडें । चालले किती आपणांपुढे ॥ तेथे माझे बापुडे । शब्द टिकतील कोठूनी ॥ ७३॥ परी पाहुनी तुम्हांला । मौन न ये धरितां मला ॥ कां कीं शब्द हेच स्तुतीला । साहित्य आहेत व्यवहारी ॥ ७४॥ म्हणून शब्देकरुन । जें जें होईल वर्णन । तें तें सर्वदा करीन । आपुल्या कृपाप्रसादे ॥ ७५॥ संतांची योग्यता भली । देवाहून आगळी ॥ अजादुजास नाही मुळीं । स्थान जवळ साधूंच्या ॥ ७६॥ हिरण्यकश्यपू-रावणांला । देवद्वेषें मृत्यू आला ॥ तैसा एकही नाही घडला । प्रकार संतहस्तानें ॥ ७७॥ गोपीचंदे उकीरड्यासी । गाडिले जालंदरासी ॥ परी त्या महात्म्यासी । नाही वाटला विषाद ॥ ७८॥ उलट राजाचा उद्धार केला । चिरंजीव करुनि सोडिला ॥ ऐशा संतांच्या योग्यतेला ॥ वर्णन करावें । कोठवरी ॥ ७९॥ संत सूर्यनारायण कृपा त्यांची प्रकाशपूर्ण ॥ संत सुखद रोहिणी रमण । कौमुदी ती तत्कृपा ॥ ८०॥ संत कस्तुरी सोज्वळ । कृपा त्यांची परिमळ ॥ संत इक्षू रसाळ । रसनव्हाळी तत्कृपा ॥ ८१॥ संत सुष्टदुष्टांप्रती । समसमान निश्चिती ॥ उलट पाप्यावरी प्रीती । अलोट त्यांची वसतसे ॥ ८२॥ गोदावरीजलांत । मळकट तेंच धुवाया येत ॥ निर्मळ ते संदुकींत । राहे लांब गोदेपासून ॥ ८३॥ जे संदुकीमध्यें बसलें । तेंही वस्त्र एकदा आलें । होतें धुवावया लागीं भलें ॥ गोदावरीचे पात्रात ॥ ८४॥ येथे संदूक वैकुंठ । गोदा तुम्ही निष्ठा घाट ॥ जीवात्में हेच पट । षड्विकार मळ त्यांचा ॥ ८५॥ तुमच्या पदाचें दर्शन । हेंच आहे गोदास्नान ॥ अवघ्या मळांते घालवून । पावन करणें समर्था ॥ ८६॥ आम्ही जन हे संसारी । मळत आहों वरच्यावरी ॥ म्हणून आम्हीच अधिकारी । संतदर्शन घेण्यास्तव ॥ ८७॥ गौतमीमाजीं विपुल नीर । आणि धुणें मळकट घाटावर ॥ तैसेंच पडल्या साचार । त्याचें हीनत्व गोदेसी ॥ ८८॥ तुम्ही सघन शीत तरुवर । आम्ही पांथस्थ साचार ॥ तापत्रयाचा हा प्रखर । तापलासे चंडाशु ॥ ८९॥ त्याच्या तापापासून सदया । करा रक्षण गुरुराया ॥ सत्कृपेची शीतळ छाया । आहे आपुली लोकोत्तर ॥ ९०॥ वृक्षाखाली बैसून । जरी लागतें वरून ऊन ॥ तरी त्या तरुलागून । छायातरू कोण म्हणें ॥ ९१॥ तुमच्या कृपेवीण पाहीं । जगांत बरें होणें नाही ॥ अर्जुनाला शेषशाही । सखा लाधला धर्मास्तव ॥ ९२॥ सुग्रीवकृपेने बिभीषणा । साधलासे रामराणा ॥ संतांमुळेच मोठेपणा । लाधला श्रीहरीसी ॥ ९३॥ ज्याचें वर्णन वेदांसी । न होय ऐशा ब्रह्मांसी । सगुण भूमीसी । लाजविलें संतांनीच ॥ ९४॥ दामाजीनें बनविला महार । वैकुंठपती रुक्मिणीवर ॥ चोखोबानें उचलण्या ढोर ॥ राबविलें त्या जगदात्मया ॥ ९५॥ संतमहत्व जाणून । पाणी वाही जगज्जीवन ॥ संत खरेच यजमान । सच्चिदानंद प्रभूचे ॥ ९६॥ फार बोलणें न लगे आतां । तूंच आम्हा माता पिता ॥ हे सद्गुरु साईनाथा । शिर्डी ग्रामनिवासिया ॥ ९७॥ बाबा तुमच्या लीलेचा । कोणा नलगे पाड साचा ॥ तेथें माझी आर्ष वाचा । टिकेल सांगा कोठून ॥ ९८॥ जड-जीवांच्या उद्धारार्थ । आपण आला शिर्डीत ॥ पाणी

ओतून पणत्यांत । दिवे तुम्ही जाळिले ॥ ९९॥ सवा हात लाकडाची । फळी मंचक करुन साची ॥ आपुल्या योगसामर्थ्याची । शक्ति दाविली भक्तजनां ॥ १००॥ वांझपणा कैकांचा । तुम्ही केलात हरण साचा ॥ कित्येकांच्या रोगांचा । बिमोड केलात उदिने ॥ १०१॥ वारण्या ऐहिक संकटे । तुम्हां न कांही अशक्य वाटे ॥ पिपीलिकेचे कोठून मोठें । ओझें मानी गजपति ॥ १०२॥ असो आतां गुरुराया । दीनावरी करा दया ॥ मी तुमच्या लागलों पायां । मागें न लोटा मजलागी ॥ १०३॥ तुम्ही महाराज राजेश्वर । तुम्ही कुबेरांचे कुबेर ॥ तुम्ही वैद्यांचे वैद्य निर्धार । तुम्हांविण ना श्रेष्ठ कोणी ॥ १०४॥ अवांतराचे पूजेस । साहित्य आहे विशेष ॥ परी पूजावया तुम्हांस। जगीं पदार्थ न राहिला ॥ १०५॥ पहा सूर्याचिया घरीं । सण दिपवाळी आली खरी ॥ परी ती त्यानें साजिरी । करावी कोणत्या द्रव्यें ॥ १०६॥ सागराची शमवावया । तहान, जल ना महीं ठाया ॥ वन्हीलागी शेकावया । अग्नी कोठून द्यावा तरी ॥ १०७॥ जे जे पदार्थ पूजेचे । ते ते तुमच्या आत्म्याचे ॥ अंश आधींच असती साचे । श्रीसमर्था गुरुराया ॥ १०८॥ हें तत्वदृष्टीचें बोलणे । परी न तैशी झाली मनें ॥ बोललों अनुभवाविणें । शब्दजाला निरर्थक ॥ १०९॥ व्यावहारिक पूजन जरी । तुमचे करुं मी सांगा तरी ॥ ते कराया नाहीं पदरीं । सामर्थ्य माझ्या गुरुराया ॥ ११०॥ बहुतेक करुन कल्पना । करितों तुमच्या पूजना ॥ तेंच पूजन दयाघना । मान्य करा या दासांचे ॥ १११॥ आतां प्रेमाश्रूकरुन । तुमचे प्रक्षालितों चरण ॥ सद्भक्तिचें चंदन । उगाळून लावितों ॥ ११२॥ कफनी शब्दालंकाराची । घालितों ही तुम्हां साची ॥ प्रेमभाव या सुमनाची । माळा गळयात घालितों ॥ ११३॥ धूप कुत्सितपणाचा । तुम्हांपुढे जाळितो साचा ॥ जरी तो वाईट द्रव्याचा । परी न सुटेल घाण त्यांसी ॥ ११४॥ सद्गुरुविण इतरत्र । जे जे धूप जाळितात ॥ त्या धूप द्रव्याचा तेथ । ऐसा प्रकार होतसे ॥ ११५॥ धुपद्रव्यास अग्नीचा । स्पर्श होतांक्षणी साचा ॥ सुवास सद्गुण तदंगींचा । जात त्याला सोडून ॥ ११६॥ तुमच्यापुढें उलटें होतें । घाण तेवढी अग्नीत जळते ॥ सद्गुण उरती पाहण्यातें । अक्षयींचे जगास ॥ ११७॥ मनींचें जळाल्या कुत्सितपण । मलरहित होईल मन ॥ गंगेच्या गेल्या गढूळपण । मग ती पवित्र सहजचि ॥ ११८॥ दीप मायामोहाचा । पाजळितों मी हा साचा ॥ तेणें वैराग्यप्रभेचा । होवो गुरुवरा लाभ मसी ॥ ११९॥ शुद्ध निष्ठेचें सिंहासन । देतो बसावया कारण ॥ त्याचे करुनियां ग्रहण । भक्तिनैवेद्य स्वीकारा ॥ १२०॥ भक्तिनैवेद्य तुम्ही खाणे । तद्रस मला पाजणें । कां कीं मी तुमचे तान्हें । पयावरी हक्क माझा ॥ १२१॥ मन माझें दक्षणा । ती मी अर्पितो आपणां ॥ जेणे नुरेल कर्तेपणा । कशाचाही मजकडे ॥ १२२॥ आतां प्रार्थनापूर्वक मात्र । घालितों मी दंडवत ॥ तें मान्य होवो आपणांप्रत । पुण्यश्लोका साईनाथा ॥ १२३॥

॥ प्रार्थनाष्टक ॥

॥ श्लोक ॥

शांतचित्ता महाप्रज्ञा । साईनाथा दयाघना ॥
दयासिंधो सत्स्वरुपा । मायातमविनाशना ॥ १॥ १२४॥
जातगोतातीता सिद्धा । अचिंत्या करुणालया ॥
पाहि मां पाहि मां नाथा । शिर्डीग्रामनिवासिया ॥ २॥ १२५॥
श्रीज्ञानार्का ज्ञानदात्या । सर्वमंगलकारका ॥
भक्तचित्तमराळा हे । शरणागतरक्षका ॥ ३॥ १२६॥
सृष्टीकर्ता विरिंची तूं । पाता तूं इंदिरापती ॥
जगत्रया लया नेता । रुद्र तो तूंच निश्चितीं ॥ ४॥ १२७॥
तुजवीणें रिता कोठें । ठाव ना या महीवरी ॥
सर्वज्ञ तूं साईनाथा । सर्वांच्या हृदयांतरी ॥ ५॥ १२८॥
क्षमा सर्वापराधांची । करावी हेंचि मागणें ॥
अभक्तिसंशयाच्या त्या । लाटा शीघ्र निवारणे ॥ ६॥ १२९॥
तूं धेनू वत्स मी तान्हें । तूं इंदु चंद्रकांत मी ॥
स्वर्नदीरुप त्वत्पादा । आदरें दास हा नमी ॥ ७॥ १३०॥
ठेव आतां शिरी माझ्या । कृपेचा करपंजर ॥
शोक चिंता निवारावी । गणू हा तव किंकर ॥ ८॥ १३१॥

या प्रार्थनाष्टकेंकरुन । मी करितों साष्टांग नमन ॥ पाप ताप आणि दैन्य । माझे निवारा लवलाहीं ॥ १३२॥ तूं गाय मी वासरुं । तूं माय मी लेंकरुं ॥ माझेविषयी नको धरुं । कठोरता मानसी ॥ १३३॥ तूं मलयागिरी चंदन । मी कांटेरी झुडूप जाण । तू पवित्र गोदाजीवन । मी महापातकी ॥ १३४॥ तुझें दर्शन होवोनियां । दुर्बुद्धी-घाण माझे ठाया ॥ राहिल्या तैशीच गुरुराया । चंदन तुजला कोण म्हणे ॥ १३५॥ कस्तुरीच्या सहवासें । मृत्तिका मोल पावतसे ॥ पुष्पासंगे घडतसे । वास सूत्रा मस्तकिं ॥ १३६॥ थोरांची ती हीच रीती । ते ज्या ज्या गोष्टी ग्रहण करिती ॥ त्या त्या वस्तु पावविती ॥ ते महत्पदा कारणें ॥ १३७॥ भस्म कौपीन नंदीचा । शिवें केला संग्रह साचा ॥ म्हणून त्या वस्तूंचा । गौरव होत चहूंकडे ॥ १३८॥ गोपरंजनासाठी । वृंदावनी यमुनातटी ॥ काला खेळला जगजेठी । तोही मान्य झाला बुधां ॥ १३९॥ तैसा मी तो दुराचारी । परी आहें तुमच्या पदरीं ॥ म्हणून विचार अंतरी । याचा करा हो गुरुराया ॥ १४०॥ ऐहिक वा पारमार्थिक । ज्या ज्या वस्तूंस मानील सुख ॥ माझे मन हे नि:शंक । त्या त्या पुरविणें गुरुराया ॥ १४१॥ आपुल्या कृपेने ऐसें करा । मनालागी आवरा ॥ गोड केल्यास सागरा । क्षारोदकपणाची नसे भिती ॥ १४२॥ सागरा गोड करण्याची । शक्ति आपणांमध्ये

साची ॥ म्हणून दासगणूची । याचना ही पुरी करा ॥ १४३॥ कमीपणा जो जो माझा । तो तो अवघा तुझा ॥ सिद्धांचा तूं आहेस राजा । कमीपणा न बरवा तुजसी ॥ १४४॥ आतां कशास्तव बोलूं फार । तूंच माझा आधार ॥ शिशु मातेच्या कडेवर । असल्या निर्भय सहजचि ॥ १४५॥ असो या स्तोत्रासी । जे जे वाचतील प्रेमेंसी ॥ त्यांच्या त्यांच्या कामनेसी । तुम्ही पुरवा महाराजा ॥ १४६॥ या स्तोत्रास आपुला वर । हाचि असो निरंतर । पठणकर्त्यांचे त्रिताप दूर । व्हावे एक संवत्सरी ॥ १४७॥ शुचिर्भूत होऊन । नित्य स्तोत्र करावें पठण ॥ शुद्ध भाव ठेवून । आपुलिया मानसीं ॥ १४८॥ हें अशक्य असलें जरी । तरी प्रत्येक गुरुवारी ॥ सद्गुरुमूर्ती अंतरी । आणून पाठ करावा ॥ १४९॥ तेंही अशक्य असल्यास । प्रत्येक एकादशीस ॥ वाचणें या स्तोत्रास । कौतूक त्याचें पहावया ॥ १५०॥ स्तोत्रपाठकां उत्तम गती । अंती देईल गुरुमूर्ती ॥ ऐहिक वासना सत्वरगती । त्यांची पुरवून श्रोते हो ॥ १५१॥ या स्तोत्राच्या पारायणें । मंदबुद्धि होतील शहाणे ॥ कोणा आयुष्य असल्या उणें । तो पठणें होय शतायु ॥ १५२॥ धनहीनता असल्या पदरीं । कुबेर येऊन राबेल घरीं ॥ हें स्तोत्र वाचल्यावरी । सत्य सत्य त्रिवाचा ॥ १५३॥ संततिहीना संतान । होईल स्तोत्र केल्या पठण ॥ स्तोत्र-पाठकाचे संपूर्ण । रोग जातील दिगंतरा ॥ १५४॥ भयचिंता निवेल । मानमान्यता वाढेल ॥ अविनाश ब्रह्म कळेल ॥ नित्य स्तोत्राच्या पारायणें ॥१५५॥ धरा बुध हो स्तोत्राविशीं । विश्वास आपुल्या मानसीं ॥ तर्कवितर्क कुकल्पनेसी । जागा मुळी देऊ नका ॥ १५६॥ शिर्डी क्षेत्राची वारी करा । पाय बाबांचे चित्तीं धरा ॥ जो अनाथांचा सोयरा । भक्तकामकल्पद्रुम ॥ १५७॥ त्याच्या प्रेरणेकरुन । हे स्तोत्र केले लेखन ॥ मज पामराहातून । ऐसी रचना होय कैसी ॥ १५८॥ शके अठराशें चाळीसांत । भाद्रपद शुद्ध पक्षांत ॥ तिथी गणेश-चतुर्थी सत्य । सोमवारी द्वितीय प्रहरी ॥ १५९॥ श्रीसाईनाथस्तवनमंजरी । पूर्ण झाली महेश्वरी ॥ पुनीत नर्मदेच्या तीरीं । श्री अहिल्येसन्निध ॥ १६०॥ महेश्वर क्षेत्र भलें । स्तोत्र तेथें पूर्ण झालें ॥ प्रत्येक शब्दांसी वदविलें । श्री साईनाथे शिरुनी मनी ॥ १६१॥ लेखक शिष्य दामोदर । यास झाला साचार ॥ दासगणू मी किंकर । अवघ्या संतमहंतांचा ॥ १६२॥ स्वस्ति श्री साईनाथस्तवनमंजरी । तारक हो भवसागरी ॥ हेंच विनवी अत्यादरी । दासगणू श्री पांडुरंगा ॥ १६३॥

श्रीहरिहरार्पणमस्तु । शुभं भवतु । पुंडलीकवरदा हरिविठ्ठल ॥

सीताकांतस्मरण जय जय राम । पार्वतीपते हर हर महादेव ॥

श्री सद्गुरुसाईनाथ महाराज की जय ॥

॥ श्री सद्गुरुसाईनाथार्पणमस्तु ॥ शुभं भवतु ॥

॥ श्री सच्चिदानंद सद्गुरु साईनाथ महाराज की जय ॥